Creative Math Marathi

करुया तयारी CET ची

English Notes – 2 – Add a Question Tag

## Question Tags

ज्यावेळी आपण कोणत्याही विधानार्थी वाक्याच्या शेवटी छोटासा प्रश्न जोडतो. तेव्हा त्या प्रश्नाला Question Tag असे म्हणतात.

### Question Tag साठी काही महत्वाचे नियम खालीलप्रमाणे आहेत.

मित्रांनो Question Tag करत असताना आपल्याला दोन प्रकारची वाक्ये दिसून येतात. काही वाक्ये होकारार्थी तर काही वाक्ये नकारार्थी असतात. म्हणून Question Tag करताना खालील काही मुद्दे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

1) होकारार्थी वाक्याचा Question Tag नकारार्थी करावा.

2) नकारार्थी वाक्याचा Question Tag होकारार्थी करावा.

3) नकारार्थी Question Tag करताना सहाय्यकारी क्रियापदाची लघुरूपे वापरतात जसे – was not साठी wasn't, is not साठी isn't असे.

**उदाहरणार्थ**

Ex. He is tired. (Add a Question Tag)

Ans - He is tired, isn't he?

वरील वाक्य He is tired. हे होकारार्थी वाक्य आहे. म्हणून या वाक्याचा Question Tag हा नकारार्थी करावा लागणार होता जो is not असा येईल परंतु आपण is not चे लघुरूप isn't हे घेतले आणि शेवटी प्रश्नचिन्ह दिले. मित्रांनो इथे शेवटी प्रश्नचिन्ह देणे गरजेचे आहे.

Ex. He is not tired. (Add a Question Tag)

Ans - He is not tired, is he?

He is not tired. हे वाक्य नकारात्मक असल्याने याचा Question Tag हा is he? असा सकारात्मक आला.

**अति महत्वाचे –** जर एखाद्या वाक्यात सहाय्यकारी क्रियापद नसेल तेव्हा काळानुसार सहाय्यकारी क्रियापद वापरावे. वाक्य भूतकाळाचे असेल तर did या सहाय्यकारी क्रियापदाचा वापर करावा आणि वाक्य वर्तमान काळातील असेल तर do किंवा does चा वापर करावा.

**उदाहरण –**

I saw a dream yesterday. (Add a Question Tag)

Ans - I saw a dream yesterday, didn’t I?

## बहुपर्यायी प्रश्न

1) You are not a student. *(Add a Question Tag)*

A) You are not a student, didn’t you?

B) You are not a student, are you?

C) You are not a student, aren’t you?

D) You are not a student, don’t you?

2) You have done very well. *(Add a Question Tag)*

A) You have done very well, have you?

B) You have done very well, you have?

C) You have done very well, haven’t you?

D) You have done very well, you haven’t?

3) She simply sat there quietly *(Choose correct question tag.)*

A) doesn’t she?

B) didn’t she?

C) wasn’t she?

D) doesn’t she?

4) He wasn’t sure he could persuade the crowd. *(Choose correct question tag.)*

A) was he?

B) didn’t he?

C) wasn’t he?

D) doesn’t he?

5) This logical sequence leads to an inevitable stampede. *(Choose correct question tag.)*

A) does it?

B) don’t it?

C) wasn’t he?

D) doesn’t it?

इयत्ता अकरावी CET तयारी साठी नोट्स, व्हिडियो आणि फ्री ऑनलाईन टेस्ट साठी पुढील लिंक वर क्लिक करा

http://creativelearning.co.in/11th-cet-preparation-2021-maharashtraboard/